# जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार

**गौण खनिज शाखा**

☎ (02564)210011 Email id : miningndb@gmail.com FAX: (02564)210041

**जप्त करण्यात आलेल्या रेती/वाळू साठयाच्या विक्रीकरीता ई-टेंडरींग/ई-ऑक्शन लिलावाची अधिसुचना**

क्रमांक/2018/गौखनि/कावि/ 133 नंदुरबार दिनांक :20 /02/2018

महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-गौखनि-10/0512/प्र.क्र.300/ख दिनांक 12 मार्च, 2013 चे शासन निर्णयातील मुद्दा क्र.17 (D) मधील अ.क्र.4 तसेच दिनांक 03 जानेवारी 2018 मधील मुद्दा क्र.20 (1) नुसार सन 2016-17 या वर्षाच्या मौजे नांदरखेडा ता.शहादा येथील वाळु घाटातील जप्त करण्यात आलेल्या वाळु साठयाचा लिलाव ई निविदा व ई ऑक्शनद्वारे करण्यात येत आहेत. जाहीर लिलावासंबंधी सर्व माहिती, वाळू लिलावाच्या अटी, शर्ती, वाळू गटाची शासकीय किंमत व इतर सर्व माहिती गौणखनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, व जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी /तहसिलदार यांचे कार्यालय येथे व https://nandurbarco.abcprocure.com व www.nandurbar.nic.in या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात आलेली आहे. इच्छूक व्यक्तीस/ संस्थेस/ लिलावधारकांना/ कंत्राटधारकांना/कंत्राटदारांना या लिलावात भाग घेण्याकरिता विनंती करण्यात येत आहे.

ई-निविदा व ई-ऑक्शन प्रक्रीयेत भाग घेणाऱ्या सर्वांना ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे आवश्यक राहील. ऑनलाईन नोंदणी करीता (Registration) पुढील माहिती व कागदपत्राची सांक्षांकित प्रती इच्छूक निविदाधारकास बंधनकारक आहे. (1) ई-मेल आयडी (2) पॅनकार्ड व आधार कार्ड (3) टिन नंबर (कंपनी असल्यास) (4) मागील तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र (सन-2014-15, 2015-16 व 2016-17) (5) निविदेतील अटी शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र अनिवार्य आहे.

ई-निविदा/ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यास पुढील प्रमाणे ना-परतावा फी अदा कराव्या लागतील.(1) निविदा फॉर्म फी रुपये 5000 (2) ज्या रेती घाटासाठी ई-निविदा प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्यासाठी अनामत रक्कम (EMD) म्हणून वाळू घाटाच्या हातच्या किमतीच्या 20% टक्के रक्कम जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी ठरवून दिलेल्या खात्यावर जमा करावी लागेल. (3) ई-निविदा नेट बँकिंग/क्रेडीट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने वेबसाईट वरून (संकेतस्थळावरून) डाऊनलोड करून खरेदी करावे लागेल त्याकरीता नोंदणी खर्च रूप्ये 2500/- व निविदा प्रक्रिया फी रूपये 1350/- अशी रक्कम जमा करावी लागेल.

जी व्यक्ती/संस्था ज्या वाळू गटाकरीता ई-निविदा भरेल, अशाच व्यक्ती/संस्थांना ई-ऑक्शन मध्ये भाग घेता येईल. ई-निविदाही ई-ऑक्शन झाल्यानंतर खुली करण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकारच्या म्हणजेच निविदा आणि लिलाव यापैकी ज्यामध्ये सर्वाधिक दर नमुद असतील त्या ठेकेदारास लिलाव देण्यात येईल.

ई-टेंडरींग / (ई-निविदा) व ई-ऑक्शन (ई-लिलाव) पद्धतीने लिलाव करावयाचा वाळू गटाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | दि. 21.02.2018 | ई - लिलाव सुचना प्रसिध्दी |
| 2 | दिनांक 21.02.2018 ते दिनांक 26.02.2018 | 21.02.2018 (बुधवार) सकाळी 10.00 वा. पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पद्धतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दिनांक 26.02.2018 (सोमवार) पर्यत सायंकाळी 6.00 पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल. नोंदणी केलेल्या व्यक्ती /संस्थांनी दिनांक 21.02.2018 (बुधवार) ते दिनांक 26.02.2018 (सोमवार) या कालावधीत सकाळी 10.00 वा.पासून ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत उपजिल्हाधिकारी (प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे संगणकीय नोंदणीत दाखल केलेले सर्व कागदपत्रे प्रत्यक्षात सादर करुन नोंदणी मान्य करुन घेणे. |
| 3 | दिनांक 21.02.2018 ते दिनांक 28.02.2018 | 21.02.2018 (बुधवार) ते 28.02.2018 (बुधवार) या कालावधीत सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 वाजेपावेतो ई-निविदा व ई-ऑक्शनसाठी भाग घेणाऱ्या लिलावधारकांना वाळु/रेती घाटाची 20% अनामत रक्कम जमा करणे. |
| 4 | दिनांक 21.02.2018 ते दिनांक 28.02.2018 | 21.02.2018 (बुधवार) ते 28.02.2018 (बुधवार) दररोज सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत निविदा ऑनलाईन पद्धतीने (संगणकीय पद्धतीने) जमा करणे. |
| 4 | दिनांक 01.03.2018 (गुरुवार) | दिनांक 01.03.2018 (गुरुवार) सकाळी 11.00 वा.पासून ई-निविदा भरलेल्या निविदा धारकांना ई-ऑक्शनसाठी ऑनलाईन पद्धतीने संगणकीय प्रणालीमध्ये वेबसाईटवर खुली करुन देण्यात येईल. |
| 5 | दिनांक 02.03.2018 (शुक्रवार) | दिनांक 02.03.2018 (शुक्रवार) सकाळी 8.00 ते सायं. 5.00 पर्यंत ई-ऑक्शन ऑनलाईन सुरु राहील. वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी 10 मिनिटे प्रमाणे 3 (तीन) वेळा वाढ करण्यात येईल. त्यानंतर ई-ऑक्शन करता वेळ वाढवून दिला जाणार नाही. |
| 6 | दिनांक 02.03.2018 (शुक्रवार) | दिनांक 02.03.2018 (शुक्रवार) सांयकाळी 06.00 वा.पासून पुढे जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे ई-ऑक्शन बाबतचा अंतिम निर्णय. |

सर्वोच्च ई-ऑक्शनधारकास (ई-लिलावधारकास) / ई-टेंडरधारकास (ई-निविदा) आलेल्या सर्वोच्च ई-बोलीनुसार वाळू स्थळ मंजूर करण्यात येईल. ज्यांच्या नावे लिलाव कायम होईल. लिलाव कायम केल्यावर लिलावधारकांना शासन निर्णय दिनांक 03 जानेवारी 2018 च्या सर्व अटी व शर्ती लागु राहतील.

**ई-टेंडरींग (ई-निविदा) अथवा ई-ऑक्शन (ई-लिलाव) स्विकारण्याचे वा नाकारण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी राखून ठेवलेले आहेत.**

इच्छुक निविदा धारकांनी रजिस्ट्रेशन प्रक्रिया, डिजीटल सिगनेचर, प्रथम स्तर मान्यता कामी एबीसी प्रोक्युअर कंपनीचे प्रतिनिधींचे दूरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंपनीच्या प्रतिनीधीचे नाव | दुरध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| 1 | परेश देशमुख | 7940016811 | | paresh@abcprocure.com |
| 2 | पुजा कोडवाणी | 7940016840 | | pooja@abcprocure.com |
| 3 | रियाज अजमेरी | 7940016843 | | rizwan@abcprocure.com |
| 4 | हिमालय वैश्नव | 7940016848/ 07940016866 | 9099090830 | himalay@abcprocure.com/ info@abcprocure.com |

तसेच लिलाव प्रक्रिया सुरु असतांना तांत्रिक मदतीसाठी एबीसी प्रोक्युअर कंपनीचे प्रतिनिधींचे दूरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कंपनीच्या प्रतिनीधीचे नाव | दुरध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी | कॉमन ई- मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | राहूल दिक्षीत | 079 40270555 | | rahul.dixit@eptl.in | support@abcprocure.com |
| 2 | परेश राजगुरु | 079 40270569 | | prashant@eptl.in | |
| 3 | पंकेश कुमार | 079 40270507 | 9374519729 | pankesh@eptl.in | |
| 4 | धर्म राठोड | 079 40270596/ 079 40270566 | 9374519754 | dharam@eptl.in | |

(दिलीप जगदाळे)

**अपर जिल्हाधिकारी नंदुरबार**

# जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

➢ **वाळू लिलाव धारकासाठी सर्वसाधारण निर्देश, अटी व शर्ती**

01. वाळू साठयासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक बोलीने ई-(ऑक्शनव्दारे) भरून लिलावाला सुरूवात करण्यात येईल.

02. ई-टेंडर/ई-ऑक्शनव्दारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास, त्या वाळू गटाचा 10 दिवसाचे आत फेरलिलाव करण्यात येईल.

03. ई-टेंडर/ई-ऑक्शनव्दारे लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणून रूपये 3,00,000/- (रूपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम म्हणून रोखीने भरावी लागेल. ज्या लिलावधारकाची अत्युच्चबोली/निविदा स्विकारण्यात येईल, त्याची रक्कम नियमानूसार त्याने भरावयाच्या बोलीच्या 1/4 रकमेत समायोजीत करण्यात येईल. ज्या लिलावधारकाची बोली /निविदा स्विकारण्यात येणार नाहीत, त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येतील.

04. लिलावाने घ्यावयाच्या रेती/वाळू चा अपेक्षित वाळू साठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घेण्याची जबाबदारी संबधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

05. ई-टेंडर/ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांचा राहील व सदर निर्णय लिलावाच्या दिवशी कळविण्यात येईल.

06. ई-टेंडर /ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर तात्काळ रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्वीकारणाऱ्या दोन व्यक्तीसह स्वखर्चाने खरेदी केलेल्या रूपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) त्वरीत करारनामा करून देईल. असे करारपत्र करून न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबधित रेती/वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्यास परिणामी लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशिरात उशीरा 7 दिवसात देण्यात येईल.

07. ज्यावेळी रेती /वाळू साठयाचा लिलाव रद्द करण्यात येईल, अशा वेळेस त्या रेती /वाळू क्षेत्राचा नव्याने ई-निविदा /ई-ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेर लिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

08. विहित केलेल्या साठयाच्या पलिकडे इतर क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन/वाहतुक करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी रेती/वाळू काढता येणार नाही.

09. जेथे वाळू साठा आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करून दर्शविणेत यावी.

10. वाळूचे/रेतीचे साठयाची वाहतूक करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतेही हानी / नूकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची /नूकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधित लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

11. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू/रेती काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. लिलावधारकास कोणत्याही वैध कारणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध यांमुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा वाळूगटाचा  ताबा न दिल्यास, लिलावाची मुदत संपण्यापूर्वी, ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल, त्या कालावधीसाठी त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल अशी रक्कम परत करताना लिलावाची देकाराची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानूसार परताव्याच्या रक्कमेची परिगणना करण्यात येईल.
12. लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था /संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.
13. लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर इत्यादी विहीत केल्याप्रमाणे अदा करावेत.
14. लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी ताबा घेतल्याच्या दिनांकापासुन 30 दिवसानंतर संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्याने वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू साठयात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.
15. सदयस्थितीत पडुन वाळूच्या/रेतीच्या साठयाच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करून दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही.
16. रेती/वाळू ची वाहतूक करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.
17. रेती /वाळू वाहतूक करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात दयावी.
18. वाळु /रेती वाहतूकीसाठी महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभागाचे परिपत्रक दि. 02 फेब्रुवारी 2016 व त्यालगत केंद्र शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील दि. 15 जानेवारी 2016 पासन् बारकोड प्रणाली लागु करण्यात आलेली असल्याने बारकोडयुक्त पावती पुस्तके असणे अनिवार्य आहे.
19. सदर प्रणालीनूसार लिलावधारकास त्याचे मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील.
20. लिलावधारक निर्धारित वाळु साठयाच्या वाहतुकीसाठी प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरून निर्दिष्ट क्रमाकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनूसार त्यास Invoice No. नंबर प्राप्त होईल. असा Invoice No. प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकास वाळू/रेतीची वाळतूक करता येणार नाही. बारकोड पावती व त्यामधील Invoice No. शिवाय वाहतूक केल्यास ती अवैध ठरवून त्यावर प्रचलित कायदे व धोरणानूसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

21. वाळू/रेती वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडुन केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनलचालकाकडे असणाऱ्या पावतीत वैध बारकोड पावती आढळली नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याचेविरध्द महाराष्ट्र जमिन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) व (8), महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनयिमन) नियम, 2013 आणि संदर्भाधिन दिनांक 03 जानेवारी 2018 च्या महसूल व वनविभाग शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल.

22. वाळू/रेती लिलावधारकाने नोदणीकृत मोबाईलवरून एसएमएसव्दारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायदयानूसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, महसूल अधिकारी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करून दयावीत.

23. गौणखनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या निरिक्षणाकरीता उपलब्ध करून दयावीत.

24. लिलावधारकाने रेती/वाळु वाहतुक करणाऱ्या वाहनांचे नोंदणी क्रमांक तसेच वाहन क्रमांक व सदर वाहनातून किती रेती/वाळु वहन (ब्रासमध्ये) करणार आहेत याची (वहन क्षमता) माहिती लिलाव घेतल्यानतर 07 दिवसाच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयात देणे बंधनकारक राहील. याशिवाय ज्या-ज्यावेळी इतर वाहनातून वाळु/रेतीची वाहतूक करणार असतील अशा वेळी सदर वाहनांची माहिती तात्काळ इकडील कार्यालयात परवानगीसाठी देण्यात यावी. सदर वाहनातून विनापरवानगी वाहतूक करता येणार नाही.

25. लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रूपये 3,00,000/- (रूपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20 टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत म्हणून विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. हि रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पुर्णत: जप्त करण्यात येईल.

26. लिलावधारकांने नियमात नमूद केलेप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनूसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार तसेच अन्य कायदे /नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा /वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणून केला पाहिजे.

27. लिलावधारक/परवानाधारक यांना पर्यावरण विषयक अटी व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदीचे पालन करणे बंधनकारक आहे.

28. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करूनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूकन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

29. अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 मधील 48 (7) व (8) नूसार तसेच इतर लागू होणाऱ्या सर्व कायदे व नियमानूसार कारवाई करण्यात येईल.

30. ई-टेंडर /ई-ऑक्शन मध्ये भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती/संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

31. लिलावधारकाने निविदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी व शर्तीचे पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करून घेतल्यानंतर पात्र लिलावधारकास वाळू साठयाचा ताबा देण्यात येईल.

32. शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

33. कोणतेही वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिणामाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, तसेच सदर वाहनांवर मोटार कायद्यानुसार व अन्य कायद्यानुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**अ.** सदर वाहनाचा वाहतूक परवाना पहिल्या गुन्ह्यासाठी 30 दिवस, दुसऱ्या गुन्ह्यासाठी 60 दिवस व तिसऱ्या गुन्ह्यासाठी 90 दिवस याप्रकारे निलंबित करण्यात येईल.

**ब.** वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायसन्सवर मोटार कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्ह्याकरीता सहा महिन्यांकरीता निलंबित केले जाईल. अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास त्याचे ड्रायव्हींग लायसन्स कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल. अशाच प्रकाराचे तिसरा गुन्हा करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास असे वाहनचालकावर/वाहनमालक तसेच सदर प्रकरणी दोषी आढळुन आल्यास लिलावधारकावर एम. पी. डी. ए. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल.

34. आयकर / विक्रीकर अधिनियमातील तरतुदीनुसार लिलावाच्या उच्चतम रकमांचे अनुषंगाने जी. एस. टी (GST) व आयकर (TDS) देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच लिलाव घेणाऱ्याव्यक्तीस विक्रीकर व आयकर खात्यातर्फे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर व मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक राहील. सदरचे कर भरल्याशिवाय वाळू साठयाचा ताबा देण्यात येणार नाही.

35. शासन ज्या प्रमाणे जी. एस. टी (GST) वसुली बाबत निर्णय देईल. त्याप्रमाणे लिलावधारक यांच्यावर सदरची बाब बंधनकारक राहील.

36. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस रुपये *5000/- (रुपये* पाच हजार) इतक्या रकमेचा संचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नाशिक यांच्या नावे काढण्यात आलेला धनाकर्ष ***(Demand* draft)** सर्वेक्षण शुल्कापोटी लिलावाच्या दिवशी जमा करावा लागेल.

*37.* लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस पर्यावरण शुल्कापोटी लिलावात गेलेल्या वाळूच्या स्वामित्वधनावरील मुल्याच्या *2%* रक्कम ही पर्यावरण शुल्क म्हणुन द्यावी लागेल.

*38.* केंद्रीय खनिकर्म मंत्रालयाचे दि.01.09.2016 च्या अधिसुचनेनुसार गौण खनिजाच्या संदर्भात लिलावात जाणा-या वाळु घाटाच्या किंमतीच्या 10% रक्कम ही **जिल्हा खनिज प्रतिष्ठान** या नावाने उघडण्यात आलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा नंदुरबार या **बँकेतील चालू खाते क्र.36129617308** या क्रमांकावर भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय वाळु साठा लिलावधारकास मंजूर केला जाणार नाही.

*39.* शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

40. लिलावधारकास शासनाचे अस्तित्वात असलेले अधिनियम, नियम, तसेच वाळु उत्खननासंदर्भात असलेले शासन निर्णय, परिपत्रके यातील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

41. मंजूर वाळु घाटातील वाळु चोरी किंवा अवैध उत्खनन व वाहतुक थांबविणेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करणेचे अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना राहतील.

42. वाळु लिलाव प्रक्रिया सुरु असताना किंवा त्यांनतर वाळु साठया संदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास इकडील कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच वाळु लिलावातील संपुर्ण रक्कम व इतर अनुषंगिक रकमा भरणे हे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

43. वाळु घाटाच्या मोक्याच्या ठिकाणी सी. सी. टिव्ही कॅमेरे (CCTV) बसवणे बंधनकारक राहील. तसेच सी. सी. टिव्ही कॅमेरेतील रेकॉर्ड करण्यात आलेला डाटाची सिडी जिल्हाधिकारी कार्यालयात दर पंधरवाड्याला सादर करणे बंधनकारक राहील.

44. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक/गौखनि-10/0316/प्र.क्र.248/ख, दिनांक 18 मार्च 2017 नुसार वाळु /रेतीच्या लिलावातील यशस्वी लिलावधारकासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मुद्रांक शुल्क भरणे अनिवार्य राहील.

45. विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांनी नमूद केलेल्या सर्व अटींचे पालन करणे निविदाधारकास / लिलावधारकास बंधनकारक राहिल. अन्यथा त्यांची लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

46. यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

47. वाळु साठयाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल. आवश्यकता भासल्यास वाळु साठयाच्या जागेवर मजुरांना जेवण बनविणे, शुध्द पाणी, वैद्यकीय उपचार व इतर सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल

(दिलीप जगदाळे)

**अपर जिल्हाधिकारी नंदुरबार**

# प्रतिज्ञापत्र

मी नामे (पूर्ण नांव)------------------------------------------------------------------------------------------
राहणार (पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा)-----------------------------------------------------------------------------
------------------------तालुका------------------ जिल्हा ------------------------ राज्य------------------ माझी/माझे संस्थेचे पॅन क्रमांक ------------------------------------ टिन क्रमांक------------------------------------

मी प्रतिज्ञापुर्वक घोषित करितो की, मला मौजे नांदरखेडा ता. शहादा जि. नंदुरबार येथील भूमापन क्रमांक186/2 या गटातील जप्त करण्यात आलेल्या अंदाजे 700 ब्रास रेती/वाळू साठ्याच्या लिलावातील सर्व अटी व शर्तीची जाणीव आहे व मी लिलावात प्रस्तावित केलेल्या किंमतीत रेती साठा घेण्यास ईच्छुक असून अपसेट प्राईसच्या 20 % अनामत रक्कम मी शासन जमा करित आहे. मला सदर रेती/वाळू साठा मंजूर झाल्यास वाळु साठ्याचा ताबा घेण्यापूर्वी मंजुर साठ्याच्या लिलावाच्या देकाराची संपूर्ण रक्कम मी चलनाद्वारे भरणा करुन मंजुर रेती/वाळू साठ्याचे निष्पादन करुन घेण्याचा हमी देत आहे. तसे न केल्यास मी जमा केलेली 20% रक्कम शासन जमा करण्यात यावी व नियमानुसार दुसऱ्या यशस्वी निविदाकारास रेती साठा मंजूर केल्यास अथवा फेरनिविदाद्वारे विल्हेवाट केल्यास तसेच शासनास झालेल्या नुकसान जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल केल्यास माझी काहीच हरकत राहणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच वाळु लिलाव प्रक्रिया सुरु असताना अथवा वाळु लिलाव प्रक्रियेनंतर मी घेतलेल्या वाळु साठ्या संदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास वाळु साठ्याची संपुर्ण रक्कम भरणेची जबाबदारी माझी राहील तसेच याबाबत मी कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा रक्कम भरणेस नकार दिल्यास मी कारवाईस पात्र राहील.

मी असेही घोषीत करतो की,

1) सदरहू रेती/वाळू साठा आणि अनुमोदीत रस्त्याची मी पाहणी केली आहे. त्यामुळे वाळु वाहतुकीची संपूर्ण जबाबदारी माझी असल्यामुळे भविष्यात वाहतुकीचा व रस्त्याबाबत प्रश्न निर्माण झाल्यास त्याचा निपटारा करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. तसेच रस्त्याबाबत अडचण निर्माण झाल्यामुळे वाहतूक न झाल्यास शिल्लक वाळु साठयाबाबत मी शासनाकडे कोणत्याही प्रकारची भरपाई मागणार नाही.

2) वाळूचा दर्जा, साठा व त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती / वाळू वाहतुकीसाठी योग्यते बाबत मी इतर कोणताही आक्षेप उपस्थित करुन वाद निर्माण करणार नाही.

3) प्रस्तुत वाळु साठ्याची लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी ताबा घेतल्याच्या दिनांकापासुन 30 दिवसानंतर संपुष्टात येईल याची मला जाणीव असून कोणत्याही परिस्थितीत वाळु साठ्याच्या वाहतुकीची मुदत वाढवून मिळणेबाबत मी प्रयत्न करणार नाही. वाळु घाटाच्या परिमाणानुसार वाहतुक करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी असल्यामुळे परिमाणापेक्षा कमी वाहतुक झाल्यास शिल्लक वाळु साठ्याबाबत मी शासनाकडे कोणत्याही प्रकारची भरपाई मागणार नाही.

वर नमुद केलेले विवेचन हे या प्रतिज्ञापत्राव्दारे करुन देत असून शासनाच्या वाळु लिलावाच्या ज्या अटी शर्ती आहेत त्या मला मान्य आहेत. अटी शर्तीचे उल्लघन झाल्यास मी कारवाईस पात्र राहील. सदरचे प्रतिज्ञापत्र केले असे

**ठिकाण :-** नंदुरबार
**दिनांक :-** /02/2018

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

**साक्षीदार**

1.पुर्ण नाव ---------------------------------------------------- स्वाक्षरी --------------------
पत्ता----------------------------------------------------------

2.पुर्ण नाव ---------------------------------------------------- स्वाक्षरी --------------------
पत्ता----------------------------------------------------------

**नंदुरबार जिल्हयातील मौजे नांदरखेडा ता.शहादा येथील जप्त करण्यात आलेल्या वाळु / रेती साठयाचे हातची किंमत दर्शविणारे विवरणपत्र**

| अ.क्र. | वाळू साठा जिथे आहे ते गाव | तालुका | गट नं. | वाळु साठा जेथे आहे त्या जमिनधारकाचे नाव | अंदाजीत वाळु साठा (ब्रास) | प्रतिब्रास किंमत स्थानिक दर | हातची किंमत (Apset Price) | अनामत रक्कम (EMD) हातच्या किंमतीच्या (Apset Price) 20% रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मौजे नांदरखेडा | शहादा | 186/2 | श्री.रोहिदास फकीरा पाटील | 700 | 1531 | 1071700 | 300000 |

स्थळ प्रतीवर म.अपर जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

(प्रमोद हिले)
**जिल्हा खनिकर्म अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी नंदुरबार करिता**